# बाल ग्राम बाल संरक्षक समिती.

सभा क्र. ३

दिनांक ५।६।२०२५
वेळ सकाळी १० वाजता.
स्थळ - अंगणवाडी पिराचीवाडी.

आज गुरुवार दिनांक ५।६।२०२५ रोजी सकाळी १० वाजता पिराची वाडी येथील अंगणवाडीत बालग्राम संरक्षक समितीची सभा घेणेत आली सदर सभेसाठी समितीचे खालील सदस्य / सदस्या हजर होते.

| अ. नं. | नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १) | सौ. कल्पना सुभाष भोसले. | सरपंच | [signature] |
| २) | श्री बाजीराव धोंडीराम रोडे | पो.पा. सदस्य. | [signature] |
| ३) | सौ. राजश्री रविकुमार भोसले. | आशा सेविका सदस्य. | [signature] |
| ४) | श्री कृष्णात रामचंद्र पाटील | मुख्या-पक सदस्य. | [signature] |
| ५) | श्री दत्तात्रय सखाराम दाभोळे. | पालक सदस्य. | [signature] |
| ६) | श्री युवराज शिवाजी सुतार. | पालक सदस्य. | [signature] |
| ७) | श्री आनंदा दादू भोसले. | पालक सदस्य | Bhosale |
| ८) | सौ. जनाबाई ज्ञानदेव डवरे | अंमलबजावणी सदस्या. | सौ. ज. ज्ञा. डावरे |
| ९) | चि. आरव दत्तात्रय दाभोळे. | मुलगा सदस्य. | A.D.D |
| १०) | कु. स्वरा नाथाजी भोसले | मुलगी सदस्या. | [signature] |
| ११) | श्री नाथाजी श्रीपती भोसले. | शाळा कमिटी सदस्य. | [signature] |

वरील प्रमाणे सन्माननीय सदस्य हजर झालेवर सभेच्या कामास सुरुवात झाली.

विषय क्र.- १ -
बाल संरक्षण, बाल हक्क, बालकांचा सहभाग. इत्यादी विषयाबाबत ग्राम स्तरावर जाणिव जनजागृती करणे.

ठराव क्रमांक- १
आजच्या सभेत वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. समिती सचिव- सौ. जमाबाई रामदेव डावरे यांनी सभेसमोर खालील माहिती दिली.

१) समस्यांचा शोध घेणे.
२) जिल्हा बाल संरक्षणामध्ये नियोजन नमूना आराखडयामध्ये बाल संरक्षण बाबींवर वार्षिक नियोजन करणे बालकांना व त्यांच्या कुटुंबाना आर्थिक आधार देणे. तसेच त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, सामाजिक सुरक्षा, वैद्यकिय सुरक्षा, उपजिवीकेचे साधन इत्यादी जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्याशी समन्वय साधणे.
३) पिडीत बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.
४) बालकावर परिणाम करणाऱ्या विविध समस्या.
५) बालविवाह, बाल कामगार, अनैतिक व्यापार, बालकाचे लैंगिक शोषण, इत्यादी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.
वरील प्रमाणे कार्यवाही करणेचे ठरले.

सूचक - नागोजी श्रीपती भोसले.
अनुमोदक - बाजीराव योंडीराम शेंडे.
ठराव सर्वानुमते मंजूर.
वरील प्रमाणे सर्वांचे आभार मानून समिती अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.